# एकविसाव्या युगातील अधोरेखित करण्यायोग्य समस्या

**श्री माधव शिवहार केंद्रे**
सहशिक्षक श्री रोकडोबा माध्य. विद्यालय,
खंडाळी रो. ता. गंगाखेड जि. परभणी

**प्रस्तावना :**

मानव हा पृथ्वीवरील इतर प्राणीमात्रापेक्षा भिन्न व सर्वात हुशार प्राणी म्हणून ओळखला जातो. या मानवाने आपले जीवनमान उंचावण्यासाठी व कमी कष्टात आपल्याला हवा असलेला उद्देश साध्य करण्यासाठी अनेक महत्वपूर्ण शोध लावले. जसे की, मोबाईल, इंटरनेट, कॉम्प्युटर अशा साधनांचा शोध लावला. परंतु या शोधातून मानवाने हव्या असलेल्या गोष्टी साध्य करता करता समाजासाठी किंवा समाजवर्गासाठी जी नितीमुल्य ठरवण्यात आली होती ती हळूहळू ऱ्हास पावत आहेत. आपल्या भौतिक सुविधेसाठी प्रगती करत गेलेला मानव हळूहळू आधुनिकतेकडे आकर्षीत झाला व त्याचा परिणाम काही चांगला तर काही वाईट होत गेला. या चांगल्या व वाईट परिणामाला मानव सामोरे जात आहे. यात निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास आपण करणार आहोत.

आजची सामाजिक परिस्थिती फर विचित्र पहावयास मिळत आहे. आजच्या युगातील तरुण मुले ही बिघडत आहेत. त्यात चित्रपट, व्यसनाधिनता, मोबाईलचा अतीवापर, मोटार बाईकचे वाढते आकर्षण इत्यादी कारणे पहावयास मिळतात. आजची युवा पिढी छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. ए.पी.जी. अब्दुल कलाम अशा थोर पुरुषांच्या विचारांची दखल न घेता 'सैराट' सारखा चित्रपट पाहून समाजाला अस्थिर करणाऱ्या घटना करत आहेत. पालकांनी वेळीच दखल न घेतल्यास आपले पाल्य समाजघातक कृत्य करु शकते यात तिळमात्र शंका नाही समाजात आजपर्यंत प्रेमकथा दाखवणारे अनेक चित्रपट होवून गेले. पण त्यांचा परिणाम समाजावर एवढ्या खोलवर का पहावयास मिळाला नाही याचे उत्तर शोधले असता एकविसाव्या शतकातील माहिती तंत्रज्ञान व मोबाईल यात झालेली भरमसाट वाढ या कारणामुळे सैराट समाजात खोलवर रुजला. अशावेळी पालकानी आपल्या पाल्याकडे मोबाईलच्या युगात कोणत्या गोष्टी गरजेच्या आहेत व तो काय करतो आहे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

मानवाच्या मुलभूत गरजापैकी एकविसाव्या शतकातील प्रमुख गरज म्हणजे मोबाईल होय. सकाळी झोपेतून उठल्यावर ब्रश करण्या अगोदर मोबाईलवरील व्हाटसअप, फेसबुकचा फराळ करणारे महानग समाजात भरपूर निर्माण झाले आहेत. मोबाईल हे केवळ वाईटच साधन नसून ते माणसा-माणसाला जोडणारे, माहितीचा अतिशय वेगाने प्रसार करणारे, मानवासाठी ज्ञानाचा भांडार असणारे साधन आहे. पण समाजातील युवा तरुण पिडी ही मोबाईलमधील व्हीडीओज, व्हीडीओ गेम्स, व्हाटसअप, फेसबुक यामध्ये आपला बहुमुल्य वेळ वाया घालवत आहेत याची खंत वाटते. आजच्या समाजासमोर मोबाईल फोन ही खुप मोठी गंभीर समस्या बनत चालली आहे. अल्पावधीतच या तरुण पिडीवर सेल्फी, इंटरनेटवरील माहिती, जीवघेणे गेम्स यांनी पगडा निर्माण केला आहे. पालकांनी वेळीच या गोष्टीची दखल घेतली नाही तर येणाऱ्या पिडीचे भविष्य अंधारमय असेल यात शंका नाही.

**समस्या :**

१) माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आजची पिडी ही मोबाईलच्या आधीन होत आहे. या मोबाईलमुळे मणक्याचे आजार तसेच नकोत्या बाबी मोबाईलवर पहात आहेत. तासनतास ते मोबाईलवर ऑनलाईन आहेत व आपला बहुमुल्य वेळ वाया घालत आहेत.

२) व्हाटसअप, फेसबुकमुळे मानवी आरोग्यावर परिणाम होत आहे. जसे मणक्याचे आजार, डोके दुखणे प्रसिद्ध नेत्रतज्ञ तात्याराव लहाने यांनी सांगितल्याप्रमाणे एका तरुण मुलाने अंधारमय खोलीत रात्रभर मोबाईल पाहिला आणि सकाळी त्याची दृष्टी नाहीशी झाली होती. असे आजार निर्माण होत आहेत.

३) इंटरनेटमुळे आज तरुण हे मोबाईलवर चित्रपट, गाणे पहात आहेत व यातून नको त्या गोष्टी आत्मसात केल्यामुळे समाजामधील सांस्कृतिक नितीमुल्यांचा ऱ्हास पहावयास मिळत आहे. यामध्ये एस. टी. बसेसने फ्रि वायफाय लावून या समस्येला खतपाणी घालण्याचा प्रयत्न केला आहे.

४) तरुण पिडी ही सेल्फी, गेम्स, व्हीडीओज या गोष्टी मुलांना आत्महत्येसाठी प्रवृत्त करत आहेत. जसे सेल्फीच्या नादात अनेक जीव गमावतात, अनेक व्हीडीओ गेम्समुळे मुल आत्महत्येसाठी प्रवृत्त होतात.

५) व्हाटसअप, फेसबुक या गोष्टीमुळे तरुणांचा देश म्हणून ओळखला जाणारा भारत आज **जगामध्ये इंटरनेटवर सर्वाधिक वेळ वाया घालवणाऱ्या देशाच्या यादीत सर्वप्रथम आहे.**

६) इंटरनेटच्या युगामध्ये भारताची तरुण पिडी आपल्या जीवनातील अमुल्य असा वेळ वाया घालवत आहेत. आणि हीच तरुण पिडी भारताचे आधारस्तंभ आहेत. त्यामुळे मनात एक चिंता निर्माण होत आहे.

अशा प्रकारे या तरुण बांधवांची देशाच्या उभारणीसाठी अत्यंत मोठी गरज आहे. ते तरुण वाया जाणार नाहीत याची काळजी आई-वडिलांनी, गुरुजणांनी व सर्व समाजांनी घेतली पाहीजे अन्यथा आपली तरुण पिडी या इंटरनेटच्या युगात फसल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भसूची :**

१. जीवनशिक्षण-मासिक
२. लोकसत्ता वृत्तपत्र
३. शिक्षण संक्रमण मासिक
४. लोकराज्य मासिक

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com